Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.
Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/उ.मा.शाखा-परीक्षा/ 2272
कोल्हापूर-416004
दि.04/01/2022

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2022 साठी आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रिलिस्ट, चलन इत्यादी जमा करणेबाबत तसेच पुनर्परीक्षार्थी (रिपिटर) तुरळक विषय (आयसोलेटेड) इ. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित छायाप्रत विभागीय मंडळास सादर करणेबाबत.....**

**संदर्भ:-** 1) राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं./परीक्षा-3/6524 दि.11/11/2021
2) राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं./परीक्षा-6774 दि.01/12/2021
3) राज्य मंडळ पत्र क्र.रा.म./परीक्षा-3/6914 दि.10/12/2021
4) कोविमं/ उच्च माध्यमिक परीक्षा /2007 दि.14/12/2021

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी ) मार्च/ एप्रिल 2022 परीक्षेकरीता आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने इत्यादी शुक्रवार दि.07 जानेवारी, 2022 रोजी संबंधित वितरण केंद्रावर वितरण प्रतिनिधीकडे जमा करावयाची आहे.

यासंदर्भात सर्व पुनर्परीक्षार्थी अथवा तुरळक विषय घेऊन आवेदन पत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापुर्वी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती त्या सोबत सादर करण्यात याव्यात. तसेच कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे सोशल डिस्टन्स (सामाजिक अंतर) चे पालन करुन गर्दी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

तसेच उपरोक्त नमुद दिनांकास पुनर्परिक्षार्थी/ तुरळक विषय विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेच्या छायाप्रती सोबत सादर न केल्यास प्रिलिस्ट स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(एस.डी.सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**वितरण केंद्र प्रतिनिधींना सुचना:-**

सर्व जिल्हा वितरण केंद्र प्रतिनिधींना कळविण्यात येते की, वरील सूचनेनुसार सर्व पुनर्परीक्षार्थी / तूरळक विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेच्या संबंधित क.महाविद्यालयाकडून जमा करुन घेवून मंडळ कार्यालयात संबंधित जिल्हा लिपिकांना देण्यात यावीत.

**प्रत माहितीस्तव:-**

1) मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
2) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा, सांगली, कोल्हापूर.